अस्तित्वातील ग्रामन्यायालय कोरपना, जिल्हा चंदप्रूर याऐवजी दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालय स्थापन करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

शासन निर्णय क्रमांकः सीआरसी २०१८/प्र.क्र.५५/का.१२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: २३ मार्च, २०१८

संदर्भ -

मा.उच्च न्यायालय मुंबई यांचे पत्र क्रमांक B(W)A-१९०८ of २०७, दिनांक १९.०९.२०१७

प्रस्तावना -

कोरपना, जिल्हा चंद्रपूर येथे दिनांक २ ऑक्टोबर, २००९ पासून ग्रामन्यायालय अस्तित्वात आहे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर राजूरा हे कोरपना, जिल्हा चंद्रपूर येथील ग्रामन्यायालयाचे कामकाज वेळोवेळी प्रत्यक्ष कोरपना, जिल्हा चंद्रपूर येथे भेट देऊन पाहतात. प्रलंबित प्रकरणांची आवश्यक संख्या व पायाभूत सुविधा यांच्या विहीत प्रमाणकांची पूर्तता होत आहे, हे पाहून, ग्रामन्यायालय गडचांदूर, ता.कोरपना, जिल्हा चंद्रपूर येथे ग्रामन्यायालयाऐवजी नियमित स्वरुपात दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालय स्थापन करण्याचा निर्णय मा.उच्च न्यायालय मुंबई यांचे स्तरावर गठीत The Establishment of Courts Committee या समितीने घेतला. त्या अनुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती प्रबंधक, मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी दिनांक २४.११.२०१७ रोजीच्या पत्रान्वये केली आहे.

त्या अनुषंगाने कोरपना, जिल्हा चंद्रपूर येथे कोरपना येथील ग्रामन्यायालऐवजी दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग हे न्यायालय स्थापन करण्याची व त्यासाठी आवश्यक पद निर्मितीस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे:

शासन निर्णय-

कोरपना, जिल्हा चंद्रपूर येथे अस्तित्वातील ग्रामन्यायालयाऐवजी दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालय स्थापन करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. पद निर्मितीचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

२. यासाठी होणारा खर्च संबंधित आर्थिक वर्षात निधिची तरतुद करुन "मागणी क्रमांक जे-१, २०१४-न्यायदान (००)(१०५) दिवाणी व सत्र न्यायालये (०२) जिल्हा व सत्र न्यायाधिश (०२)(०१) जिल्हा व सत्र न्यायाधिश (२०१४ ०१७२) दत्तमत" या लेखाशीर्षाखालील उद्दीष्टांसाठी अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२३१७१२५१००१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Amogh
Shyamkant Kaloti

Digitally signed by Amogh Shyamkant Kaloti
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f733daf00a6028414c43d0cc10d82acab3b732c4ed d56e818f8a3b355588753, serialNumber=9ebeebf21dc54ceec51e6d5ffc84bb94ca6af894 97279007d66e97dc13547037, cn=Amogh Shyamkant Kaloti
Date: 2018.03.23 17:15:31 +05'30'

(अ. श्यां. कलोती)
विधि सल्लागार नि सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई,
४. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
५. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
६. महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय मुंबई,
७. सर्व अ.मु.स. / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. सदस्य सचिव, विधि सेवा प्राधिकरण, मुंबई,
९. संचालक, अभियोग संचालनालय, मुंबई,
१०.प्रबंधक, उच्च न्यायालय मुंबई, नागपूर, औरंगाबाद व पणजी खंडपीठ,
११.सर्व प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, जिल्हा व सत्र न्यायालये,
१२.सह संचालक, न्यायिक अधिकारी प्रशिक्षण संस्था, उत्तन / नागपूर,
१३.महालेखापाल १, (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
१४.महालेखापाल २ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,
१५.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१६.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१७.जिल्हा कोषागार अधिकारी, चंद्रपूर,
१८. उपजिल्हा कोषागार अधिकारी, चंद्रपूर,
१९.वित्त विभाग, व्यय-५ / आ.पु.क., मंत्रालय, मुंबई,३२
२०. विधि व न्याय विभागातील सर्व कार्यासने
२१. निवडनस्ती (का.१२)